नियमीत दिवाणी दावा क्रमांक ११०/२०१२
CNR No.- MHKO18-000320-2012

निशाणी ५९ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीं यांनी त्यांचे विरुध्द झालेला " नो क्रास " आदेश रद्द होवून मिळणेसाठी केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी नं. २ चे पायास प्लास्टर घातले होते त्यामुळे त्यास हालता येत नव्हते. प्रतिवादी न. २ व ३ हे त्याच्या सेवेत होते त्यामुळे त्यांना तारखेस हजर राहता आले नाही अथवा वकीलांना भेटता आले नाही. त्यांनी जाणुन बुजून उलटतपास घेण्यास टाळाटाळ केलेले नाही. सबब त्यांचे विरुध्द झालेला नो क्रॉस चा आदेश रद्द होवून मिळणे विषयी त्याने विनंती केली आहे.

२. वादींनी म्हणणे देवून प्रस्तुत अर्जास विरोध केला आहे. त्याचे असे कथन आहे की, प्रतिवादींनी यापूर्वीही विविध कारणांनी उलटतपास लांबविला आहे. तसेच मुदती घेतल्या आहेत. सबब त्यांनी अर्ज नामंजूर करणेस विनंती केली आहे.

३. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि. ०३/१०/२०१६ रोजी वादींतर्फे साक्षीदार बाळगोंडा मलगोंडा पाटील यांचे सरतपासाचे ॲफिडेव्हीट ( नि. ४२ ) दाखल केले आहे. त्यावर दि. ०५/०३/२०१८ रोजी उलटतपास नाही असा आदेश झाला आहे. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०३/०४/२०१८ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादींनी निशाणी ५८/४ कडे वैदयकीय प्रमाणपत्र हजर हजर केले आहे. त्याचे अवलोकनावरुन प्रस्तुत अर्जातील कथनांमध्ये तथ्य आढळून येते. अर्जात दिलेले कारण समाधानकारक वाटते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने व दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेसाठी अर्ज मंजूर करणे योग्य ठरते.

४. वरील सर्व परिस्थितींचा व कारणांचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करणेत येतो –

अर्ज मंजूर करणेत येतो.

सही/–

दिनांकः २०/०४/२०१८ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कुरुंदवाड